# आकाशवाणी नागपूर,

# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

# बुधवार, दिनांक ०३ जुलै २०२४

## ठळक बातम्या

1. **जनतेचा आमच्यावर ठाम विश्वास असल्याचं पंतप्रधान मोदी यांचं राज्यसभेत प्रतिपादन- संसदेचं पावसाळी अधिवेशन आज संस्थगित.**
2. **मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी अडवणूक, दिरंगाई, आणि पैशांची मागणी केल्यास कठोर कारवाई- मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश.**
3. **नळगंगा - वैनगंगा नदी जोड प्रकल्पामुळे विदर्भातील ३ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार- उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती.**

**आणि**

4. **विदर्भ साहित्य संघातर्फे देण्यात येणाऱ्या वाङ्मय पुरस्कारांसाठी साहित्यकृती पाठविण्याचं आवाहन.**

*****

मोदी-राज्यसभा/संसद संस्थगित

भारताची राज्यघटना ही प्रत्येक सरकारसाठी दीपस्तंभासारखी मार्गदर्शिका असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना बोलत होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या राज्यघटनेमुळेच शून्य राजकीय वारसा असलेल्या व्यक्तीला राजकारणात येण्याची आणि इतक्या मोठ्या पदावर पोहचण्याची संधी मिळाली, असंही ते म्हणाले. देशातल्या जनतेनं गेल्या १० वर्षांमधल्या आमच्या देशसेवेच्या प्रयत्नांना पाठबळ आणि आशीर्वाद दिला. आम्ही देशाच्या अर्थव्यवस्थेला जगातली तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवू शकतो, यावर त्यांचा ठाम विश्वास होता, त्यामुळेच जनतेनं सलग तिसऱ्यांदा आमचं सरकार निवडून दिलं, असं ते म्हणाले. दरम्यान, पंतप्रधानांचं भाषण सुरू असतानाच, विरोधी पक्षांनी हौद्यात येत गोंधळ घातला आणि त्यानंतर सभात्याग केला. विरोधकांनी सभात्याग करून सभागृहाचा अवमान केल्याची तीव्र प्रतिक्रिया राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी दिली. विरोधकांनी आत्मचिंतन करावं आणि आपल्या कर्तव्याचं पालन करावं, असा सल्लाही सभापतींनी दिला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणावर धन्यवाद प्रस्ताव मंजूर केल्यानंतर, अध्यक्ष जगदीप धनखड यांनी राज्यसभेचं कामकाज आज अनिश्चित काळासाठी तहकूब केलं. दरम्यान, लोकसभेचं कामकाज

कालच संस्थगित करण्यात आल्यामुळे संसदेचं हे पावसाळी अधिवेशन संस्थगित झालं आहे.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेसाठी आवश्यक प्रमाणपत्र उपलब्ध करून देणे, फॉर्म भरुन घेणे यासह या संपूर्ण प्रक्रियेत महिलांची अडवणूक केल्यास किंवा प्रक्रियेत दिरंगाई केल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या आहेत. त्याचबरोबर ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शकपणे आणि जलदगतीने होईल यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष ठेवावं. या योजनेचं संनियंत्रण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आहेत. योजनेसाठी नावनोंदणी, अर्ज करणे आदी कामांसाठी होणारी गर्दी लक्षात घेऊन अर्ज करण्याची मुदत ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढविण्यात आली आहे. या योजनेसाठी एजंटच्या माध्यमातून कुणीही अर्ज भरू नये, असं आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितलं. दरम्यान, चंद्रपूर शहरातील सर्व महिलांना योजनेचा ऑनलाईन आणि ऑफलाईन लाभ मिळण्याच्या दृष्टीने मनपातर्फे ५ निःशुल्क सेवा केंद्र सुरू करण्यात आले आहेत. या सुविधा केंद्रांचा लाभ सर्व महिलांनी घेण्याचं आवाहन आयुक्त विपीन पालीवाल यांनी केलं आहे.

पाणी व्यवस्था/ मत्स्यव्यवसाय

नळगंगा-वैनगंगा नाडीजोड प्रकल्पाच्या DPR साठी १६०० कोटींचा खर्च येणार असून, या महत्वाच्या प्रकल्पामुळे विदर्भातील ३ लाख हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असल्याची माहिती फडणवीस यांनी दिली. तत्पूर्वी, पाणी टंचाई असणाऱ्या शहरांमध्ये इमारत विकासकाला पर्यायी पाण्याची व्यवस्था करावी लागेल, तसे त्याने खरेदीदाराला करारपत्रात लिहून द्यावे लागेल आणि ते रेरालाही कळवावे लागेल. तशा सूचना नगरविकास विभागामार्फत देण्यात येतील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावरच्या लक्षवेधी सूचनेवर दिली. चेतन तुपे यांनी ती उपस्थित केली होती. पाणी वितरण व्यवस्था नव्याने तयार करून, पाण्याचा पुनर्वापर करण्यावर भर देण्यात येत आहे. सध्या चाळीस टक्के पाणी गळती होत असून ती वीस टक्के करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असं ते म्हणाले.

विदर्भ विशेष-विधानसभा

वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय, नागपूर येथील विकासकामांसाठी ५०० कोटी रुपयांचा निधी देण्यात आला असून बांधकाम विभागाकडून काम सुरू आहे. त्यावर संबंधित अधिकार्यांचं नियंत्रण नाही, या मोहन मते यांच्या आक्षेपाला अंशतः

स्वीकारून सदर काम प्रगतीपथावर असून त्यामुळे रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत नाही, असं उत्तर मंत्री रवींद्र चव्हाण यांनी आज विधानसभेत सांगितलं. तर मुंबई - नागपूर समृद्धी महामार्गाच्या दुरवस्थेवर आणि अपघातांवर देखील आज विधानसभेत चर्चा झाली. ज्यावर उत्तर देताना मंत्री दादा भुसे यांनी अपघातामागे सदोष बांधकाम नसून वाहनाचा वेग आणि चालकाच्या बेशिस्तीला जबाबदार ठरविलं. अमरावती, यवतमाळ, अकोला, बुलडाणा आणि वाशीम जिल्ह्यातल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध थकीत देयकं अदा करण्यासाठी विशेष शिबिरं घेण्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानपरिषदेत केली. किरण सरनाईक यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते.

दीक्षा भूमी-विधानसभा

दीक्षाभूमी परिसरात भूमिगत पार्किंगला विरोध म्हणून आंदोलन करणाऱ्या भीमसैनिकांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. आम्ही आंदोलन करणारे आहोत गुन्हेगार नाहीत. आंदोलकांवरील गुन्हे सरकारने मागे घ्यावेत, अशी मागणी आज सभागृहात उत्तर नागपूरचे आमदार डॉ.नितीन राऊत यांनी केली. दीक्षाभूमी येथे पार्किंगसाठी खोदलेल्या खड्ड्यामुळे स्तूपाला धोका होईल, बोधिवृक्ष अडचणीत येईल. त्यामुळे दीक्षाभूमी येथे भीमसैनिकांनी स्वयंस्फूर्तीने आंदोलन केले होते. आंदोलन करणाऱ्या शेकडो ज्ञात-अज्ञात आंदोलकांवर बजाजनगर पोलिसांनी दोन गंभीर प्रकारचे गुन्हे दाखल केले आहेत. दीक्षाभूमी परिसरात विकासाच्या योजनेबाबत समाजाशी चर्चा का करण्यात आली नाही? असा जाब विचारून यासाठी पोलीस प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि सोबतच राज्य सरकारही जबाबदार असल्याचा आरोप डॉ. राऊत यांनी केला.

मोफत गणवेश/कापूस-विधानसभा

महाराष्ट्रातल्या कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन त्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रति हेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा पणन मंत्री अब्दुल सत्तार यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. यावर्षी लांब धाग्याच्या कापसाची सरकारी खरेदी केंद्र सरकारने नमूद केलेल्या नव्या दरानं होईल, असं त्यांनी सांगितलं. हरीश पिंपळे यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. दरम्यान, केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा योजनेअंतर्गत तसंच राज्य शासनाच्या गणवेश योजनेअंतर्गत शासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना प्रत्येकी दोन गणवेश मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातल्या ४४ लाख ६० हजार

विद्यार्थ्यांना याचा लाभ होणार आहे. गणवेशाची गुणवत्ता आणि दर्जा उत्कृष्ट असेल याची काळजी घेण्यात आल्याची माहिती, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी आज विधानसभेत दिली.

अंबादास दानवे

सभागृहात आक्षेपार्ह शब्द वापरल्याबद्दल निलंबित झालेले विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिलगिरी व्यक्त केली आहे. आपल्या निलंबनाचा फेरविचार करावा, अशी विनंतीही त्यांनी उपसभापती नीलम गोऱ्हे यांना पत्राद्वारे केली आहे. दानवेंच्या निलंबनाचा निर्णय मागे घेण्याबाबतच्या विचारावर चर्चा करण्यासाठी उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या दालनात आज दुपारी तीन वाजता बैठक पार पडली. मात्र या बैठकीत काही ठोस निर्णय घेण्यात आला नाही. याबाबत उद्या निर्णय घेण्यात येणार आहे.

अमृत वृक्ष आपल्या दारी

केंद्र शासनाच्या वतीने सन 2024- 25 मध्ये 'एक पेड मां के नाम' ही योजना तर राज्य सरकारच्या वतीने 'अमृत वृक्ष आपल्या दारी' ही योजना दिनांक 15 जून ते 30 सप्टेंबर दरम्यान राबविण्यात येत आहे. याचीच सुरुवात म्हणून महाराष्ट्र वनविभागातर्फे राज्यात विविध ठिकाणी वन महोत्सव केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. १ जुलै रोजी साजरा झालेला कृषिदिन तसेच वृक्षलागवड सप्ताहाचे औचित्य साधून सुरू केलेल्या या उपक्रमाबद्दल अधिक माहिती देत आहेत मुख्य वन संरक्षक शैलेश टेम्भूर्णीकर__

***होल्ड बाईट (२९ सेकंद)***

***शासनाने अलीकडे अमृतवृक्ष आपल्या दारी हि योजना सुरु केलेली आहे. या योजनेद्वारे शाळा, महाविद्यालय शासकीय कार्यालय किंवा एनिफॉर्म सर्विस जे आहेत ते या सगळ्यांना मोफत रोपे पुरवठ्याची योजना आहे. त्याच पद्धतीने सामान्य जनतेला सवलतीच्या दरामध्ये आम्ही विविध प्रजातीची रोपे उपलब्ध करून देणार आहोत. तरी वनमहोत्सव कार्यक्रमाचे मोठ्या प्रमाणावर आपण सहभागी व्हा.***

कारंजा आकांक्षित तालुका

केंद्र सरकारच्या नीती आयोगाने आकांक्षित तालुका म्हणून वर्धा जिल्ह्यातील कारंजा तालुक्याचा समावेश केला आहे. कारंजा तालुक्यातील नीती आयोगाने घालून दिलेले आरोग्य, पोषण आहार, शेती, शिक्षण, पायाभूत सुविधा या सारखे निर्देशांक सुधारण्याकरिता 4 जुलै ते 30 सप्टेंबर 2024 या कालावधीत संपूर्णता अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा जिल्हास्तरीय उद्घाटन सोहळा 6 जुलै

रोजी वर्धा जिल्ह्याच्या कारंजा तालुक्यातील काजळी या गावातील रुद्र मंगल कार्यालयाच्या पटांगणावर आयोजित करण्यात आला आहे.

विदर्भ साहित्य संघ पुरस्कार

ख्यातनाम वैदर्भीय लेखकांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वैदर्भीय लेखकांना दरवर्षी विदर्भ साहित्य संघातर्फे विविध वाङ्मय प्रकारांत पुरस्कार प्रदान केले जातात. त्याशिवाय, दोन नवोदित लेखकांना देखील त्यांच्या पहिल्या पुस्तकांसाठी पुरस्कृत केलं जातं. त्याचप्रमाणे विदर्भ साहित्य संघाच्या शताब्दी वर्षापासून डॉ.श्रीधर शनवारे, डॉ.आशा सावदेकर आणि तात्यासाहेब देशपांडे सोनाटकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राज्य पातळीवरील लेखकांच्या कलाकृतींना पुरस्कृत करण्यात येतं. या सर्व पुरस्कारांसाठी लेखक किंवा प्रकाशकांनी १ ऑगस्ट २०२३ ते ३१ जुलै २०२४ या दरम्यान प्रकाशित झालेली पुस्तके या पुरस्कारांसाठी दि. ३० ऑगस्टपर्यंत सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४००१२ या पत्त्यावर पाठवावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. पुरस्कारांचे स्वरूप रोख ५००० रुपये आणि स्मृतिचिन्ह असं असून, विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात दि.१४ जानेवारी २०२५ रोजी हे पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

*****